BS 530
.S26

Orien
Mar

THE LIBRARY OF CONGRESS

THE LIBRARY OF CONGRESS

Śāstrācā sārāśa.

# शास्त्राचा सारांश.

## COMPENDIUM OF THE BIBLE.

---

मुंबईमध्यें आमेरिकान मिशन छापखान्यांत
छापिलें. सन १८४५.

---

American Mission Series. No. 19. 2000 Copies.

BOMBAY:
AMERICAN MISSION PRESS;
T. GRAHAM, PRINTER.

1845.

A. B. C. F. M. LIBRARY.
Published by
THE BOMBAY MISSION.

BS530 S26 Orien Mar
27/13 cog 75

# शास्त्राचा सारांश.

ज्या देवाने सर्व मनुष्यांस उत्पन्न केलें, ज्याने सर्वांस बुद्धि दिल्ही व जो सर्वांचें पोषण व संरक्षण करितो, त्याची ओळख व सेवा केली पाहिजे, याविषयीं सर्व लोक मान्य आहेत. त्याची ओळख कशी होईल, त्याचे गुण काय आहेत व ते कसे समजावे, आणि त्याची सेवा कशी करावी, हें ज्ञान प्राप्त होण्याचे उपाय दोन आहेत, ह्मणजे त्याच्या कामांवरून व त्याच्या शास्त्रावरूनहि हें ज्ञान होतें. सगळी सृष्टि देवाचें काम आहे आणि तिजकडून त्याचे गुण प्रगट झाले आहेत. ज्याने पृथ्वी, सूर्य, चंद्र, तारे, व सर्व इतर पदार्थ शून्यापासून उत्पन्न केले, आणि जो त्यांचें रक्षण नेहमी करितो, तो सर्वांचा धनी व सर्वांहून शक्तिमान् आहे. ज्याने सर्व पिढ्यांतील मनुष्यांस बुद्धि दिल्ही, तो सर्वांहून बुद्धिमान् व ज्ञानी आहे; आणि जो सर्वांचें पोषण व संरक्षण करितो, जो त्यांस खावयास, प्यावयास, वस्त्रें नेसावयास आणि चालण्याची व बोलण्याची शक्ति देतो, तो सर्वांहून चांगला व दयाळू आहे. याप्रमाणें देवाचीं कामें पाहून त्याचे गुण कसे आहेत असा विचार करून समजावें.

Compendium of the Bible. American Mission Series. No. 19. 2000 Copies. 1845.

GOOD 5 FEB'32

मनुष्यांवर देव कसा अधिकार करितो, त्याचें भजन करण्याची रीति काय व मनुष्यांचें तारण होण्याचा उपाय काय, हें सर्व लोकांस समजावें ह्मणून देवानें दया करून एक धर्मशास्त्र दिल्हें आहे. जे अभिमान सोडून आपण पापी व अज्ञानी आहों, असें समजून देवापासून ज्ञान मागून शास्त्र वाचितात, आणि जेवढें समजलें तेवढें मनापासून मानितात, ते इहलोकीं व परलोकीं सुख पावतील. या मोठ्या गोष्टी लोकांस पक्केपणीं समजाव्या आणि त्यांनी धर्म आचरतांना न चुकावें, ह्मणून पूर्वी काय काय झालें, आतां काय काय करावें, आणि पुढें कसें कसें होईल, अशा गोष्टी या शास्त्रांत विस्तारानें सांगितल्या आहेत; त्यांतील सारांश काढून एथें लिहिला आहे.

प्रथम देवानें सगळें जग, ह्मणजे पृथ्वी, सूर्य, चंद्र, तारे, इत्यादिक शून्यापासून उत्पन्न केलें; त्यांखेरीज सृष्टीमध्यें आकाशलोक आणि नरक हीं दोन स्थानें आहेत, असें शास्त्रांत सांगितलें आहे. आकाशलोकांत देव आपले गुण प्रगट करून फार गौरवयुक्त व तेजस्वी आहे. देवानें बहुत आत्मे उत्पन्न करून आकाशलोकांत ठेविले; ते पवित्र आहेत, आणि त्यांस दूत असें नाम दिल्हें आहे. आकाशलोक पृथ्वीसारिखा आहे असें कल्पूं नका, कां कीं तेथील राहणारे खात पीत नाहींत व लग्न करीत नाहींत, व विलास भोगीत नाहींत; त्यांस कांहीं दुःख किंवा रोग होत नाहीं, आणि ते कधीं मरत नाहींत. आकाशलोक ह्मणून एक पवित्र व अविनाशी स्थान आहे, आणि त्यांत देव कांहीं पाप राहूं देत नाहीं; यास्तव जेव्हां तेथल्या दूतांतील कित्येक पाप करूं लागले, तेव्हांच देवानें त्यांस

451211
'34

बाहेर काढून नरकांत टाकिलें. त्यांस भुतें असीं ह्मणतात; ते बहुत आहेत, आणि त्यांतील जो मुख्य त्याला सैतान अथवा साटान असें नाम दिल्हें आहे. ते दुःख भोगितात आणि आपण पापी व दुःखी असतां सर्व माणसांस पापांत व दुःखांत पाडावयाचा प्रयत्न करितात. मनुष्यांचें तारण होण्यासाठीं जो उपाय शास्त्रांत सांगितलेला आहे, त्याला जीं माणसें अंगीकारीत नाहींत, तीं माणसें मेल्यावर त्या भुतांच्यासंगतीं निरंतर पीडा भोगितील; परंतु हा उपाय जीं माणसें अंगीकारितात, तीं मेल्यावर सुखी राहतील.

सृष्टि उत्पन्न करितांना जगास उजेड देण्याला आणि रात्र व दिवस वेगळे वेगळे करायाला व काळाची गति मोजायाला देवानें सूर्य, व चंद्र, यांस उत्पन्न करून आकाशांत ठेविलें, पाणी जमा करून त्याला समुद्र ह्मटलें, आणि कोरड्या भूमीला पृथ्वी ह्मटली. मग देवाच्या आज्ञेवरून पृथ्वीवर झाडें, गवत, इत्यादिक उत्पन्न झालीं. मग आकाशामध्यें पांखरें व पाण्यामध्यें मासे व भूमीवर वनपशू व ग्रामपशू व सर्व प्रकारचीं जनावरें व चळणवळण करणारें, हीं सगळीं देवाच्या आज्ञेकडून आपापल्या जातींप्रमाणें उत्पन्न झालीं. मग देवानें सुखी व पवित्र एक पुरुष आदाम नावें व एक स्त्री हाव्वा नावें उत्पन्न करून त्यांस असा आशीर्वाद दिल्हा कीं, "तुह्मी सफळ होऊन वाढा व पृथ्वी भरा, आणि समुद्रांतील माशांवर आणि आकाशांतील पांखरांवर आणि पृथ्वीवरील प्रत्येक जिवावर धनीपण करा."

अणखी देवानें एदन देशांत एक बाग लाविला, आणि

लोक उत्पन्न झाले. मनुष्यें थोडीं होतीं तेव्हां तीं बहुत वर्षे वांचलीं, परंतु जेव्हां तीं बहुत झालीं व त्यांमध्यें पाप फार वाढूं लागलें, तेव्हां देवाने त्यांचें आयुष्य कमी केलें. पूर्वी मनुष्यांच्या पापांमुळें जलप्रलयेंकरून त्यांचा नाश कसा झाला, हें मनामध्यें धरून लोकानी कांहीं वेळ देवाचें भय धरून त्याच्या आज्ञा पाळिल्या. परंतु मनुष्यांची बुद्धि दुष्टच आहे, ह्मणून जो निराकार व पवित्र भगवान् त्याचें भजन व सेवा करण्याविषयीं त्यांस कंटाळा लवकर आला; यास्तव कित्येक लोक देवाला सोडून नास्तिकपण धरूं लागले, कित्येक लोक देवाविषयीं अज्ञानी होऊन, सूर्य, चंद्र, इत्यादिकांचें भजन करूं लागले, आणि लोकांमध्यें जे राजे होते व ज्यांच्या हातून कांहीं अचाट कामें घडलीं, ते देवाचे अवतार होते, किंवा ते मेल्यावर आपल्या पुण्यामुळें देव झाले, असें कित्येक मनुष्य कल्पून त्यांचें भजन करण्याकरितां त्यांच्या मूर्त्ती घडून स्थापून त्यांची पूजा करूं लागले.

याप्रमाणें देवाची भक्ति सोडून लोक पापांमध्यें पडले, आणि बहुत प्रकारचीं अमंगळ कामें करूं लागले. त्या वेळेस आब्राहाम नामें एक खरा भक्त होता, आणि जेव्हां त्याच्या देशांतील लोक मूर्त्तिपूजा करूं लागले, तेव्हां देवाने त्याला सांगितलें कीं, तूं आपला देश आणि आपलें कुळ आणि आपल्या बापाचें घर यांपासून निघून जो देश मी तुला दाखवीन त्यांत जा. मग मी तुला मोठी प्रजा असें करीन आणि तुला आशीर्वाद देईन आणि तुझें नाव असें मोठें करीन कीं तें आशीर्वादरूप होईल, आणि जे तुला आशीर्वाद देतात त्यांस मी आशीर्वाद देईन, आ-

णि जो तुला शाप देतो त्याला मी शाप देईन, आणि तुज-कडून पृथ्वींतील सगळे वंश आशीर्वाद पावतील. मग आब्राहाम आपली बायको व सर्व खटलें घेऊन खनान देशांत गेला. त्या देशांतील लोक बहुधा लटक्या देवांची भक्ति करून पापांमध्यें गुंतले होते, परंतु दोन नगरें सदोम व गमोरा नामें व त्यांच्या जवळचीं कांहीं गांवें, त्यांतील लोक अमंगळ कामें करून विशेष पापी झाले. त्यांचें भारी पाप व अमंगळ कामें पाहून त्यांचा नाश करावा असा निश्चय करून देवानें आब्राहामास कळविलें. तेव्हां त्या पापी लोकांवर कळवळा करून त्यांचा नाश न व्हावा ह्मणून आब्राहामाने वेळोवेळ आग्रहाने देवाच्याजवळ विनंती केली; मग देवाने त्याला सांगितलें कीं त्या नगरांमध्यें जर दाहा धार्मिक मनुष्यें असतील, तर त्या दाहा जणांमुळें मी त्या नगरांचा नाश करणार नाहीं; परंतु त्या नगरांमध्यें इतकीं नीतिवंत माणसें सांपडलीं नव्हतीं, केवळ एक माणूस लोट नामें व त्याचें कुटुंब होतें. तेव्हां लोटाजवळ देवानें आपल्या दूतांस पाठवून सूचना केली कीं, ज्या लोकांमध्यें तूं वस्ती करितोस त्यांच्या पापामुळें त्यांचा नाश होणार आहे, ह्मणून आपलें कुटुंब घेऊन लवकर निघून जा. मग लोट आपली बायको व दोन कन्या यांस घेऊन निघाला, आणि त्याच दिवसीं गंधक व अग्नि यांची वृष्टि देवाने त्या नगरांवर पाडिली आणि त्यांमध्यें जे होते ते सर्व नाश पावले.

खनान देशांत देवाने आब्राहामाला वेळोवेळ दर्शन दिल्हें आणि त्याची संपत्ति फार वाढविली. आब्राहामाने आपल्या चाकरमनुष्यांस चांगली नीति व देवाचें भजन

करण्याचा मार्ग शिकविला, आणि भक्तिकरून त्या सगळ्या देशांमध्यें तो नामांकित झाला.

आब्राहाम मरण पावल्यावर त्याची संतति त्या देशांत राहिली; तिने खऱ्या देवाची भक्ति केली व त्याच्या कृपेंकरून नामांकित झाली. आब्राहामापासून इझाक जन्मला, आणि इझाकाला याकोब नामें पुत्र झाला, त्याचें आडनाव इस्राएल होतें, आणि यावरून त्याच्या संततीला इस्राएल लोक असें नाम दिल्हें आहे. कांहीं वर्षें गेल्यावर त्या देशांत मोठी महागाई पडली आणि तेथें कांहीं खावयास मिळेना, यास्तव ते सर्व इस्राएल लोक मिसर देशांत राहावयास गेले. त्यांस मिसर देशांतल्या राजाने राहावयास जागा दिल्ही, आणि कांहीं वर्षें त्यांचा आदर फार केला. नंतर हे लोक बहुत वाढत आहेत, हें पाहून राजाला भय वाटलें; मग तो त्यांस पिडूं लागला आणि ते चाकर होऊन बहुत दुःख सोसते झाले. मग या संकटापासून आपण सुटावें ह्मणून ते देवाच्याजवळ विनंती करूं लागले, आणि देवाने त्यांची विनंती मानून एक सोडविणारा मोशे नामें पाठविला. तो मोशे आब्राहामाच्या वंशांतला होता, आणि त्याचा जन्म मिसर देशांत झाला; तो प्रौढ झाल्यावर राजाच्या भयामुळें दुसऱ्या देशांत पळून जाऊन तेथें राहिला. मग चाळीस वर्षें गेल्यावर देवाने त्याला दर्शन देऊन कांहीं साक्षात्कार दाखवून त्याला इस्राएल लोकांस संकटांतून काढावयास पाठविलें. मग मोशे देवाच्या आज्ञेप्रमाणें मिसर देशांत परतून गेला, आणि आपला भाऊ आहरोन यास घेऊन राजा जो फारो नामें त्याच्याजवळ जाऊन त्याला बोलला

कीं, इस्राएल लोकांचा देव जो परमेश्वर तो ह्मणतो कीं, माझा सण करण्याकरितां माझ्या लोकांस रानामध्यें जाऊं दे. तेव्हां राजानें ह्मटलें, परमेश्वर कोण आहे ? त्याला मी जाणत नाहीं आणि इस्राएल लोकांस मी जाऊं देणार नाहीं.

तेव्हां मोशे व आहरोन यानी देवाच्या आज्ञेप्रमाणें बहुत चमत्कार करून राजा व त्याची प्रजा यांस पीडिलें. ते चमत्कार या प्रकारचे होते कीं आहरोनानें आपली काठी नदीवर लांबविली आणि त्या नदींतील व सर्व देशांतील पाणी रक्त झालें; मग लोकांस पाणी प्यावयास कोठेहि मिळालें नाहीं. आणि मोश्यानें आकाशाकडे आपला हात लांबविला, तेव्हां सर्व देशावर गाढ अंधार पडला, आणि तीन दिवसपर्यंत मिसर लोकांस कांहीं दिसलें नाहीं, त्यांमधील कोणीएक बाहेर गेला नाहीं, आणि कोणीएक उठला नाहीं, परंतु इस्राएल लोकांच्या घरांमध्यें उजेड होता. असें मोशे व आहरोन यानी चमत्कार करून राजा व प्रजा यांस पीडिलें, परंतु राजा इस्राएल लोकांस जाऊं देईना. शेवटीं मोशे बोलला कीं, सर्व मिसर लोकांतील प्रत्येक कुटुंबामध्यें जो ज्येष्ठ पुत्र तो आज रात्रीं मरेल. तेव्हां जसें मोश्यानें सांगितलें तसें झालें, ह्मणजे त्याच रात्रीस सगळ्या मिसरांतील कुटुंबामध्यें जो ज्येष्ठ पुत्र तो मेला; परंतु इस्राएलांच्या घरांतील कोणीएक मेला नाहीं. तेव्हां राजा प्रजांसुद्धां भयाभीत होऊन त्यानें इस्राएल लोकांच्याजवळ फार आग्रहानें विनंती केली कीं, तुह्मी लवकर निघून जा, नाहीं तर आह्मी सर्व मरूं. तेव्हां मोशे व सर्व इस्राएल माणसें आपल्या बायका व लेंकरें

कां कीं जो त्याचें नाम निष्कारण घेतो त्याला यहोवा निरपराध असें मानणार नाहीं.

४ शाब्बाथ जो दिवस त्याला पवित्र पाळावयास तूं आठीव. साहा दिवस खप, आणि आपलें सर्व काम कर. परंतु यहोवा जो तुझा देव त्यासाठीं सातवा दिवस विश्रांवा आहे; त्यांत तूं कांहीं काम करूं नको, आणि तुझा पुत्र, अथवा तुझी कन्या, अथवा तुझा चाकर, अथवा तुझी चाकरीण, अथवा तुझा पशु, अथवा तुझ्या दरवाज्यांतील तुझा विदेशी न करो; कां कीं यहोवाने साहा दिवसांत आकाश, व पृथ्वी, व समुद्र, यांस व यांमध्यें जीं सर्व त्यांस उत्पन्न केलें, आणि सातव्या दिवसीं तो स्वस्थ राहिला; यास्तव यहोवाने शाब्बाथ दिवसाला आशीर्वाद देऊन त्याला पवित्र ठरविलें.

५ यहोवा जो तुझा देव जो देश तुला देतो त्यांत तुझें आयुष्य दीर्घ व्हावें, ह्मणून आपला बाप व आपली आई यांचा सन्मान कर.

६ तूं हत्या करूं नको.

७ तूं जारकर्म करूं नको.

८ तूं चोरी करूं नको.

९ तूं आपल्या शेजाऱ्याविषयीं खोटी साक्ष देऊं नको.

१० तूं आपल्या शेजाऱ्याच्या घरावर लोभ ठेवूं नको. आपल्या शेजाऱ्याची बायको, अथवा त्याचा चाकर, अथवा त्याची चाकरीण, अथवा त्याचें गुरूं, अथवा त्याचा गाढव, अथवा आपल्या शेजाऱ्याचें जें कांहीं असेल, त्याजवर लोभ ठेवूं नको.

ह्या दाहा आज्ञांशिवाय देवाने लोकांस नेमशास्त्र दिलें

त्या नेमशास्त्रांत यज्ञ, धर्मस्नान, अर्पण, सुंता इत्यादिक हीं मुख्य आहेत. या रीतींतील कित्येकांचा अर्थ असा आहे कीं, जो तारणारा मनुष्यांमध्यें अवतार घेऊन आपला प्राण देऊन लोकांच्या पापांसाठीं प्रायश्चित्त करणार होता, त्याचें हें प्रायश्चित्त दाखविण्यासाठीं यज्ञ करण्याचा नेम सांगितला होता. सर्व लोकांचें अंतःकरण पापापासून निर्मळ होण्याचें अगत्य दाखविण्यासाठीं धर्मस्नान करावयास सांगितलें होतें, आणि देव जो पाऊस पाडून धान्य पिकवून सर्वांचें पोषण करितो, त्याचे उपकार मानण्यासाठीं धान्याचें कांहीं पहिलें पीक वर्षोंवर्षीं देवाला अर्पण करावयास सांगितलें होतें. या सर्व गोष्टी मोश्याने लिहून इस्राएल लोकांस दिल्ह्या.

यानंतर मोशे सर्व लोकांसुद्धां खनान देशाकडे जाऊं लागला, आणि ते रानांतून जात असतां देवाने फार चमत्कार करून त्यांचें पोषण व संरक्षण केलें. खनानाजवळ पोहोंचल्यावर मोशे मेला. त्याच्या मरणानंतर यहोशवा जो देवाने अगोदर नेमलेला, तो लोकांवर अधिकार करूं लागला. त्याने इस्राएल लोकांस खनान देशांत आणिलें, आणि सर्व देश आपल्या स्वाधीन करून देवाच्या आज्ञेप्रमाणें बहुत विभाग करून लोकांस वांटून दिल्हे.

यहोशवाच्या मरणानंतर कांहीं वर्षांनी इस्राएल लोक अन्यधर्माच्या लोकांसीं मिळून त्यांच्या देवांची पूजा करूं लागले. तेव्हां या पापामुळें देवाची अवकृपा त्यांवर झाली आणि त्यांच्या शत्रूंनी लढाई करून त्यांस जिंकून त्यांचे फार हाल केले. मग इस्राएल लोकांनी आपलें पाप कबूल

करून देवाजवळ विनंती केली, आणि त्याने त्यांची प्रार्थना मानून त्यांस संकटांतून सोडविलें.

याप्रमाणें इस्राएल लोकांनी वेळोवेळ केलें. जितकेदां ते देवाला सोडून अन्यदेवांची रीति मानूं लागले, तितकेदां त्यांचे हाल झाले; आणि जेव्हां पश्चात्तापी होऊन ते खऱ्या देवाकडे फिरले, तेव्हां त्याची कृपा ते पावले.

इस्राएल लोकांमध्यें बहुत मोठे राजे व उपदेशक उत्पन्न झाले. यहोशवाच्या मरणानंतर सुमारें पांचशें वर्षे गेल्यावर दावीद राजा राज्य करूं लागला. तो धार्मिक व देवाचा फार भक्त होता, तो उपदेशकहि होता आणि त्याने भगवंताचें भजन करण्यासाठीं बहुत गीतें केलीं; तीं शास्त्रामध्यें लिहिलीं आहेत. देवाने दावीद राजावर फार कृपा केली आणि त्यास आशीर्वाद देतांना सांगितलें कीं, जो तारणारा येणार आहे तो तुझ्या वंशामध्यें जन्म घेईल. त्या तारणाऱ्याविषयीं राजाने बहुत भविष्य गोष्टी सांगितल्या; त्या गोष्टी शास्त्रामध्यें लिहून ठेविल्या आहेत.

दावीदाच्या मरणानंतर त्याचा पुत्र शलमोन नामें राज्य करूं लागला. तो महा शाहाणा आणि फार विद्वान् होता. त्या देशांतील जी राजधानी यरूशालेम नामें तिजमध्यें जीयोन नामें एक नामांकित डोंगर होता; त्या डोंगरावर शलमोन राजाने देवाच्या आज्ञेप्रमाणें एक मोठें शोभायमान देऊळ बांधिलें. त्या देवळाजवळ यज्ञ, होम, अर्पण, भजन, प्रार्थना इत्यादिक क्रिया करावयास सगळे लोक आपापल्या गांवांतून तीन वेळा प्रतिवर्षी यरूशालेमास जात असत, आणि जीयोन डोंगरावर देवळामध्यें मोठा समुदाय मिळून एका चित्ताने देवाचें भजन करून

जो आमचा तारणारा व प्रभु आहे त्याचेंच भजन व सेवा आह्मी करूं, ह्मणून कबूल करिता झाला.

त्या वेळेस इस्राएल लोकांशिवाय सर्व जगांतील मनुष्यें मूर्त्तिपूजा करून पापांमध्यें गुंतलीं होतीं. जरीं देवाने इस्राएल लोकांवर एवढे उपकार केले आणि आपलें भजन करण्याचा मार्ग एवढा प्रसिद्ध केला, तरीं ते अन्यधर्माच्या लोकांसीं मिळाले आणि त्यांची वहिवाट शिकून त्यांच्या रीतीप्रमाणें वारंवार चालते झाले. तेव्हां उपदेशक व भविष्यभाषी यांकडून देवाने त्यांस बहुत वेळा निषेधून त्यांचें पाप व मूर्खपण दाखवून याप्रमाणें सांगितलें कीं, अहो इस्राएल लोक, तुमचा जो उत्पन्न करणारा व राखणारा आहे त्याला सोडून अन्य देवांकडे तुह्मी कां जातां? मूर्त्तिपूजा तुह्मी कां करितां? जे मूर्त्तिपूजक ते लांकूड किंवा दगड घेऊन माणसाची किंवा पशूची आकृति घडवून शोभेसाठीं तिजवर फुलें सोनें रुपें इत्यादिक लावितात. मग देवळामध्यें ती मूर्त्ति आणून स्थापना करितात व तिच्या पायां पडून प्रार्थना करून तूं आमचा देव आहेस आम्हास तार, असें ह्मणतात; आणि हें केवळ लांकूड अथवा दगड आहे, हें ते विसरतात. असे जे देव त्यांचें भजन तुह्मी करूं नका, त्यांच्यानी कांहीं बरें किंवा वाईट करवत नाहीं; ते माणसांच्या हातचें काम आहेत; त्यांस तोंडें आहेत परंतु ते बोलत नाहींत; त्यांस डोळे आहेत परंतु ते पाहत नाहींत; त्यांस कान आहेत परंतु ते ऐकत नाहींत; त्यांस नाकें आहेत परंतु ते हुंगीत नाहींत; त्यांस हात आहेत परंतु चांचपीत नाहींत; त्यांस गळा आहे परंतु शब्द निघत नाहींत. त्यांसारिखा तुमचा देव नाहीं

त्यापासून सर्व सृष्टि उत्पन्न झाली व तिचें संरक्षण तो नेहमी करितो; तो सर्व जगाचें पोषण करितो, तो निराकार व सर्व ठिकाणीं आहे. सर्व कामें तो पाहतो सर्वांची प्रार्थना तो ऐकतो, आणि त्यांचें साह्य करावयास तो सिद्ध व शक्तिमान् आहे. अवघ्या लोकांत बुद्धि, ज्ञान, व शक्ति इत्यादिक देवापासून प्राप्त झाल्या आहेत. परंतु मूर्त्तिची भक्ति अगदी व्यर्थ आहे आणि कोणाला कांहींच उपयोगी कधींहि पडत नाहीं; त्या अन्यदेवाची सेवा तुह्मी जर करीत जातां, तर तुमचा नाश निश्चयें होईल.

आणि जेव्हां हें पाप लोकांमध्यें फार माजलें तेव्हां देवानें त्यांस शिक्षा लाविली. आहाब राजा राज्य करीत असतां साडेतीन वर्षे कांहीं पाऊस न पडून भारी दुकाळ झाला. तेव्हां एक नामांकित उपदेशक एलिया नामें याच्या आज्ञेकडून राजानें आपल्या सर्व प्रजा जमा केल्या आणि त्यांच्यासमोर देवानें एक चमत्कार करून लोकांमध्यें जे मूर्त्तिपूजक त्यांची फजिती केली, आणि आपलें खरेंपण स्थापिलें. हें पाहून लोक देवाची भक्ति करूं लागले व त्याच दिवशीं पाऊस पडला.

याप्रमाणें उपाध्ये व भविष्यभाषी यानी वेळोवेळ मूर्त्तिपूजा करण्याविषयीं लोकांस उपदेश करून निषेध केला. अणखी देवानें त्यांस शिक्षा लावून आपला क्रोध दाखविला आणि चमत्कार करून आपलें मोठेंपण व शक्ति व पवित्रता त्यांस प्रगट केली. तथापि ते अधिक वाईट करीत गेले आणि शेवटीं ते एवढे पापिष्ठ झाले कीं देवाची अवकृपा त्यांवर बहुत झाली, आणि बाबेल देशाच्या राजानें मोठ्या फौजेसहित येऊन लढाई करून यरूशालेम घेतलें,

आणि राजा व सर्व श्रीमंत लोक यांस घेऊन आपल्या राज्यांत नेऊन ठेविलें. मूर्त्तिपूजा करण्यासाठीं इस्राएल लोकांस देवानें एवढी शिक्षा लाविली होती; यानंतर इस्राएल लोकांस यहूदी असें नाम झालें. तेव्हां हे लोक परस्वाधीन होऊन फार दुःख सोसूं लागले, मग त्यांतील कित्येक आपले अपराध मनांत आणून पश्चात्तापी झाले, आणि आपलें पाप देवाजवळ कबूल करून त्याच्या रीतीप्रमाणें फिरून चालूं लागले. बाबेली लोक मूर्त्तिपूजक होते ह्मणून त्यांसीं यहूदी लोक मिळाले नाहींत, परंतु वेगळे राहून आपल्या लोकांसीं लग्न करून आपल्या पूर्वील रीतीप्रमाणें चालले. त्या देशांत यहूदी लोक राहतांना त्यांमध्यें कित्येक मोठे भक्त व नामांकित माणसें उत्पन्न झालीं, आणि त्यांच्या रक्षणासाठीं ज्या कांहीं चमत्कारिक गोष्टी घडल्या त्यांतील एक दोन पुढें लिहिल्या आहेत.

बाबेलाच्या राजानें एक मोठी सोन्याची मूर्त्ति घडविली आणि तिची स्थापना करविण्यासाठीं आपले सर्व सर्दार, अमलतदार इत्यादिकांस बोलाविलें. जेव्हां ते आणि त्यांसुद्धां अगणित समुदाय मिळाला तेव्हां राजानें त्या सर्व लोकांस आज्ञा केली कीं, ज्या वेळेस तुह्मी सगळ्या प्रकारचीं वाद्यें ऐकाल त्या वेळेस सर्व पडून जी मूर्त्ति स्थापिली आहे तिचें भजन करा; आणि जर कोणी पडून मूर्त्तीचें भजन न करील तर तो त्याच घटकेस जळजळीत भट्टींत टाकिला जाईल. मूर्त्ति स्थापल्यावर राजानें ऐकलें कीं तीन यहूदी माणसानीं मूर्त्तीचें भजन केलें नाहीं. मग राजानें त्या माणसांस बोलावून विचारिलें कीं, तुह्मी

माझ्या मूर्त्तीचें भजन केलें नाहीं ही गोष्ट खरी आहे कीं काय ? मग त्यानी उत्तर दिल्हें कीं, होय, आह्मी तुझ्या मूर्त्तीचें भजन केलें नाहीं आणि कधीं करणार नाहीं. असें त्यांचें बोलणें ऐकून राजा फार रागें भरला आणि त्यांस जळत्या भट्टींत टाकावें ह्मणून आपल्या चाकरांस आज्ञा केली. मग राजाच्या चाकरानी त्या तीन माणसांस घेऊन जळत्या भट्टींत टाकिलें, परंतु अग्नीपासून त्यांस कांहीं दुःख किंवा उपद्रव झाला नाहीं. मग हा चमत्कार पाहून राजास फार आश्चर्य झालें, आणि त्यानें त्या माणसांला भट्टींतून काढून त्यांचा फार सन्मान केला. अशा गोष्टी घडल्यावरून सर्व लोकांस परमेश्वराचें मोठेंपण, व शक्ति, व पवित्रता, इत्यादिक गुण प्रगट झाले.

इस्राएल लोक सत्तर वर्षें परस्वाधीन राहिल्यावर बाबेल मुलखांत एक नवा राजा झाला आणि त्याने त्यांस आपल्या पूर्वील देशास जावयासाठीं निरोप दिल्हा. मग ते फारकरून मिळून आपल्या देशास गेले आणि ते यरूशालेम नगर व त्यामध्यें देऊळ बांधूं लागले. आपल्या पापामुळें एवढें दुःख सोसल्यावर लोकानी मूर्त्तिपूजा करण्याची इच्छा फिरून धरिली नाहीं. यानंतर ते सुमारें एकशें वर्षें आपल्या अमलदारांच्या स्वाधीन राहिले, मग ते रोमी बादशाहाच्या स्वाधीन झाले.

तारणाऱ्याच्या येण्याविषयीं बहुत भविष्य गोष्टी शास्त्रामध्यें लिहून ठेविल्या होत्या; त्या गोष्टींचा सारांश असा आहे कीं, जेव्हां आदाम आणि हाव्वा जीं सर्व लोकांचे पूर्वज तीं सैतानाच्या लबाडीकडून पापांत पडलीं, तेव्हां देवाने त्यांस कळविलें कीं अमुक समयीं स्त्रीच्याठायीं ता-

रणारा जन्मेल आणि सैतानाच्या शक्तीपासून मनुष्यांस मोकळें करील. नंतर देवाने आब्राहामाला सांगितलें कीं, तुझ्या वंशांत तारणारा जन्मेल आणि अवघ्या पृथ्वींतील लोकांचा तारणोपाय करील. तेव्हां दावीद राजाला देवाने कळविलें कीं, तुझ्या कुळांत तारणारा जन्मेल; यानंतर एक भविष्य बोलणारा दानीयेल नामें याने कळविलें कीं, बाबेलापासून यहूदी लोक आपल्या देशांत परतल्यानंतर सुमारें पांचशें वर्षांनी तारणारा येईल. अणखी या भविष्य वचनांमध्यें ह्मटलें होतें कीं, जो तारणारा येणार तो बेथलेहेम गांवामध्यें कुमारीपासून पुरूष संयोगावांचून जन्मेल, आणि बहुत चमत्कारिक गोष्टी केल्यावर मनुष्यांच्या पापांसाठीं प्रायश्चित्त करण्याकरितां बहुत दुःख भोगून आपला प्राण देईल, आणि पुनः जिवंत होऊन उठेल. या भविष्य गोष्टींवरून जेव्हां तारणाऱ्याच्या येण्याची वेळ जवळ आली, तेव्हां यहूदी लोकांस व ज्या दुसऱ्या लोकांस या भविष्य गोष्टी माहीत होत्या, ते सर्व त्या तारणाऱ्याची वाट पाहूं लागले.

मग पृथ्वीच्या उत्पत्तीपासून चार हजार वर्षें पुढें आणि आतांपासून सुमारें अठराशें चाळीस वर्षांमागें जो तारणारा पूर्वी सांगितलेला तो मनुष्यांमध्यें प्रगट झाला. ही गोष्ट असी झाली कीं, योसेफ नामें एक पुरूष याने मारया नामें एक कुमारी इजसीं लग्नाचा करार केला होता. यांची संगति झाल्यापूर्वी देवाच्या एका दूताने मारयेला दर्शन देऊन कांहीं क्षेमगोष्ट बोलून सांगितलें कीं, तूं पोटीं गर्भधारण करिसील व पुत्रालाहि प्रसवसील आणि तो परात्पराचा पुत्र ह्मटला जाईल. तेव्हां मारयेने दूताला

ह्मटलें कीं, मी पुरुषाला जाणत नाहीं यावरून हें कसें घडेल ! मग दूत उत्तर देतां तिला बोलला, पवित्र आत्मा तुजवर येईल आणि परात्पराची शक्ति तुजवर सावली करील, यावरून जें पवित्र तुजकडून जन्म पावेल तें देवाचा पुत्र ह्मटला जाईल. यानंतर दूताने योसेफाला दर्शन देऊन ही गोष्ट कळविली, मग योसेफाने आपल्या बायकोला अंगिकारिलें; परंतु ती आपल्या प्रथम संभवलेल्या पुत्राला प्रसवे तोंपर्यंत तो तिच्याजवळ गेला नाहीं, आणि त्याचें नाम येशू ठेविलें.

येशू ख्रीस्ताच्या जन्मकाळीं एक नवा तारा आकाशामध्यें प्रकाशला. कित्येक ज्ञानी माणसें तो तारा पाहून व त्याच्या दिसण्याचें कारण समजून येशू ख्रीस्ताचा शोध करून बेथलेहेम गांवाजवळ आले, आणि तेथें त्याचें भजन केलें. जो तारणारा येणार त्याचा जन्म झाला आहे, असें वर्त्तमान ऐकून भक्त लोक फार हर्षित झाले. परंतु बहुतकरून लोकांनी ही गोष्ट ध्यानांत ठेविली नाहीं. योसेफ व मारया तीं दावीदाच्या वंशांतील होतीं, परंतु राज्यभ्रष्ट होऊन गरीब झालीं, आणि हेरोद नामें एक परदेशी माणूस राज्य करीत होता.

तरुणपणामध्यें येशू ख्रीस्त फार प्रसिद्ध झाला नाहीं, योसेफ व मारया यांच्या घरीं राहून त्यांच्या आज्ञेंत तो वागला. तो सुमारें तीस वर्षांचा झाल्यावर अधिक प्रसिद्ध होऊं लागला, प्रथम एक मोठा उपदेशक व भविष्य बोलणारा योहान्न नामें याने इस्राएल लोकांस सांगितलें कीं, देवाचें राज्य जवळ आहे, जो तारणारा जगामध्यें येणार तो तुह्मामध्यें लवकर प्रगट होईल ह्मणून त्याची वाट

सिद्ध करा आणि पश्चात्ताप करून योग्य आचरण धरा.
यानंतर येशू ख्रीस्त योहान्नाजवळ आला आणि योहान्न त्याला पाहून लोकांस बोलला कीं, जगाचें पाप हरण करणारा ज्याविषयीं मी तुह्मास बोललों तो हाच आहे. तेव्हां येशू ख्रीस्ताने बाप्तिस्मा घेतला, तेव्हां पवित्र आत्मा कबुत्रासारिखा त्यावर उतरला आणि आकाशांतून देवाची वाणी झाली कीं हाच माझा प्रिय पुत्र आहे याकडून मी फार संतोषित झालों आहें. मग येशू ख्रीस्त रानांत गेला आणि तेथें चाळीस दिवस उपास केल्यावर त्याची प्रचीति पाहावयास सैतान त्याच्याजवळ आला, आणि नानाप्रकारच्या उपायानी त्याला पापांत पाडावयास झटला; परंतु त्याचे सर्व उपाय व्यर्थ झाले. पहिला माणूस आदाम नामें जो सर्व लोकांचा पूर्वज, त्याची प्रचीति पाहून सैतानाने त्याला व त्याच्या सर्व संततीला पापांत पाडून आपल्या स्वाधीन करून घेतलें. लोकांच्या पापांसाठीं प्रायश्चित्त करावें आणि पापांमुळें जो दंड होणार त्यापासून त्यांस मोकळें करावें, ह्मणून येशू ख्रीस्त अवतरला, आणि जर कोणत्याहि योगाने तो पापांत पडला असतां किंवा त्याला किंचित् पाप लागलें असतें, तर तो कोणाचेंहि तारण करावयास समर्थ झाला नसता, आणि मनुष्यांसाठीं कांहींच तारणाचा उपाय राहिला नसता. परंतु सैतान नाना प्रकारच्या युक्तीने त्याची प्रचीति पाहून आपणच पराभव पावला आणि येशू ख्रीस्त पवित्र राहिला.
मग येशू ख्रीस्त गांवोगांवीं व शहरोशहरीं फिरत उपदेश व चमत्कार करीत गेला; त्याची कीर्त्ति फार वाढ़िली आणि हजारोंहजार लोक त्याच्याजवळ मिळाले.

तेव्हां त्याने त्यांस उपदेश केला आणि समुदायांमध्यें स
जे रोगी आणि ज्यांला कोणतेंहि दुःख होतें, त्यानी त्यां
बरें केलें. ते चमत्कार या प्रकारचे होते कीं, एका दि
वर्सी येशू ख्रीस्त नाईन ह्मटलेल्या नगरास गेला आणि
त्याचे बहुत शिष्य व मोठा समुदाय त्यासंगातें गेला
नंतर जेव्हां तो नगरच्या वेसीजवळ आला होता, तेव्ह
पाहा एक मेलेला मनुष्य बाहेर नेला होता; तो आपल्य
आईचा एकुलता पुत्र, तीहि विधवा होती, आणि त्या नग
राचा मोठा समुदाय तिच्याबरोबर होता. तेव्हां प्रभु
तिला पाहून तिजवर कळवळला आणि तिला बोलला
रडूं नको, मग तो जवळ येऊन ताटीस शिवला आणि
खांदेले उभे राहतांना तो बोलला, तरुणा, मी तुला सां
गतों, ऊठ, तेव्हां तो मेलेला उठून बसला आणि बोलू
लागला; मग त्याने त्याला आईच्या हवाला केलें. नंतर
अवघ्यांस भय लागलें आणि ते देवाला गौरवीत बोलले
कीं, आह्मामध्यें मोठा भविष्यभाषी उठला आहे अणखी
देवाने आपल्या लोकांची भेट घेतली आहे; मग त्यावि
षयीं ही गोष्ट बाहेर सगळ्या यहूदांत आणि सगळ्या
चहुंकडल्या देशांत प्रगट झाली.

एका दिवर्सी संध्याकाळ झाल्यावर येशू ख्रीस्ताचे
शिष्य त्याजवळ येऊन बोलले, ही ओस जागा आहे आ
णि वेळ आतां होऊन गेली आहे; समुदायानी गांवांमध्यें
जाऊन आपणांकरितां खाणें विकत घ्यावें ह्मणून त्यांस
निरोप दे. परंतु येशू त्यांस बोलला, त्यांस जानयाचें
कारण नाहीं, तुह्मी त्यांस खावयाला द्या. तेव्हां ते त्या
ला ह्मणतात, पांच भाकरी व दोन मासे यांवाचून आह्मा

जवळ एथें कांहीं नाहीं. तेव्हां तो बोलला, तीं एथें मजवळ आणा. मग त्याने समुदायांस गवतावर बसावयास आज्ञा देऊन आणि त्या पांच भाकरी व दोन मासे घेऊन वर्त्तें आकाशाकडे पाहून स्तुति केली; नंतर भाकरी मोडून शिष्यांस दिल्ह्या आणि शिष्यानी समुदायास दिल्ह्या. मग सर्व लोक खाऊन तृप्त झाले; नंतर उरलेल्या चुरांच्या भरलेल्या बारा करंड्या त्यानी उचलिल्या आणि बायका व लेंकरें यांशिवाय ज्या पुरुषानी खाल्लें, ते सुमारें पांच हजार होते.

एका समयीं तो आपले शिष्य व मोठा समुदाय यांसुद्धां यरीहोपासून बाहेर जातां तीमीयाचा पुत्र बार्त्तीमी जो आंधळा तो वाटेजवळ भीक मागत बसला. आणि येशू नाजोरी वाटेने चालत आहे, असें ऐकून तो ओरडून बोलूं लागला, हे येशू दावीदाच्या संताना, मजवर दया कर. तेव्हां त्याने उगें राहावें असें बहुतानी त्याला हडसून सांगितलें, परंतु तो फार अधिक ओरडला, हे दावीदाच्या संताना, मजवर दया कर. तेव्हां येशूने उभें राहून त्याला बोलावयास सांगितलें, मग ते त्या आंधळ्याला बोलावून त्याला ह्मणतात, धीर धर, ऊठ, तो तुला बोलावितो; नंतर तो आपलें वस्त्र टाकून उठून येशूजवळ आला. तेव्हां येशूने त्याला विचारिलें, म्या तुजसाठीं काय करावें ह्मणून इच्छितोस ? मग आंधळा त्याला बोलला, माझ्या सद्गुरू, मला दिसावें. तेव्हां येशू त्याला बोलला, जा, तुझ्या विश्वासाने तुला तारिलें आहे; मग त्याला तेव्हांच दिसलें आणि तो वाटेने येशूच्या मागें चालला.

याप्रमाणें येशू ख्रीस्ताने चमत्कार करून सर्व लोकांस,

प्रमाण दिल्हें कीं मनुष्यांचें तारण करावयास आपणास सामर्थ्य आहे. त्याचा उपदेश ऐकून व त्याचे चमत्कार पाहून बहुत लोकानी कबूल केलें कीं, जो तारणारा जगामध्यें येणार होता तो निश्चयें हाच आहे. असें कल्पून कित्येकानी त्याचा जयजयकार करून त्याला राजा करावयास इच्छिलें, परंतु त्यानें नाकबूल करून लोकांस कळविलें कीं, पृथ्वींतील राजांसारिखा मी राजा नाहीं. परंतु जरीं बहुत लोकानी येशू ख्रीस्ताला मानिलें आणि हा तारणारा निश्चयें आहे असें कबूल करून त्याजवर विश्वास ठेविला, तरीं पंडित व उपाध्ये यानी त्याला अव्हेरिलें, क[illegible] कीं ते दुष्ट होते. जेव्हां त्यांच्या पापांमुळें येशू ख्रीस्तानें त्यांचा निषेध करून त्यांस ढोंगी व आंधळे वाटाडी व ठकविणारे असें ह्मटलें, तेव्हां पंडित व उपाध्ये येशू ख्रीस्ताचे वैरी झाले आणि त्याचा नाश करण्याची इच्छा धरूं लागले, परंतु एवढ्या लोकानी त्याजवर विश्वास ठेविला कीं ते भ्याले. ज्या भविष्य गोष्टी येशू ख्रीस्ताविषयीं धर्मशास्त्रामध्यें लिहिल्या आहेत, त्या गोष्टींचा अर्थ यहूदी लोकांस बहुतकरून समजला नव्हता, ह्मणून जो तारणारा येणार त्याजविषयीं ते कल्पित होते कीं तो मोठा राजा होईल आणि आह्मास रोमीलोकांच्या हातून सोडवून पृथ्वींतील सगळ्या राज्यांचा पराजय करून एक मोठें राज्य स्थापील परंतु येशू ख्रीस्त असा नव्हता, तो गरीब माणूस असा दिसला, ह्मणून यहूदी लोकांच्या अभिमानी अधिकाऱ्यानी त्याला अंगिकारिलें नाहीं. येशू ख्रीस्ताचें काम पाहून ते एकमेकांमध्यें ह्मणूं लागले कीं, तो बहुत चमत्कार करितो खरें, आणि जर आह्मी त्याला स्वस्थ राहू देतों त

गळे लोक त्याजवर विश्वास ठेवितील, मग आमची अब्रू
जाईल आणि आमचा नाश होईल. याप्रमाणें अधिकारी
पंडित व उपाध्ये यानी परस्परें विचार करून निश्चय
ठरविला कीं, येशू ख्रीस्ताला मारून टाकावें. असा नि-
श्चय केल्यावर येशू ख्रीस्ताला धरून त्याजवर दोष ठेवावा
म्हणून ते शोध करूं लागले, परंतु त्याच्या कामांमध्यें
किंवा बोलण्यामध्यें कांहीं दोष सांपडला नव्हता. तेव्हां
मुख्य उपाध्यानी येशू ख्रीस्ताला शपथ घालून ह्मटलें कीं,
तूं देवाचा पुत्र आहेस किंवा नाहींस हें आह्मास सांग.
तेव्हां तो कबूल झाला कीं, मी देवाचा पुत्र आहें. मग
अधिकाऱ्यानी येशू ख्रीस्तावर दुर्भाषणाचा दोष ठेवून त्या-
ला मरणास योग्य ठरविलें, आणि अमलदाराची आज्ञा
घेऊन त्याला हातपायांस खिळे मारून वधस्तंभीं दिल्हें.
याप्रमाणें मारल्यावर साहा तास तो राहिला व फार दुःख
सोसून मेला. त्या वेळेस भूमिकंप झाला आणि सूर्य अदृश्य
होऊन त्या सर्व देशावर अंधार पडला, आणि जे मेलेले
होते त्यांतील कोणी जिवंत होऊन लोकांस दर्शन दिल्हें.
संध्याकाळीं एका शिष्याने येऊन येशू ख्रीस्ताचें प्रेत घे-
ऊन एका कबरेंत ठेविलें.

येशू ख्रीस्त सर्व सृष्टीचा धनी असतां आपलें रक्षण न
करून दुष्ट माणसांच्या स्वाधीन होऊन त्यांच्या हातून
मरण पावला, हें जर कोणाला आश्चर्य वाटेल, तर
त्याने येशू ख्रीस्ताविषयीं अणखी विचार करून समजावें
कीं लोकांचें तारण करण्याकरितां येशू ख्रीस्त मनुष्या-
चा देह धरून जन्मला, आणि पापी माणसांच्या तार-
णासाठीं जो उपाय करण्याचा आणि जें दुःख सोसण्याचें

होतें, तो उपाय करावा तें दुःख त्याला सोसावें लागलें
मनुष्यांच्या तारणासाठीं केवढें दुःख सोसण्याचें होतें,
सर्व त्याला पूर्वीं माहीत होतें, त्याला कांहीं अकस्मा
कधीं झालें नाहीं. तो स्वतां दुष्ट माणसांच्या स्वाधी
झाला आणि त्यांच्या हातून मरण पावून त्यानें सर्व लोक
च्या पापांचें प्रायश्चित्त केलें. आपल्या मरणाविषयीं अगो
दर त्यानें लोकांस सांगितलें कीं, मी आपला जीव फिरू
घ्यावा ह्मणून देतों ; कोणी मजपासून तो घेत ना
परंतु मी आपणच तो देतों, मला तो सोडण्याचा अ
कार आणि फिरून घेण्याचा अधिकार आहे.

मरणापूर्वीं येशू ख्रीस्तानें लोकांस सांगितलें कीं,
मेल्यावर तिसऱ्या दिवसीं जिवंत होऊन उठेन. ही गो
मनांत आणून मुख्य उपाध्या व कोणी दुसरीं माणसें
भेदाराजवळ गेलीं, आणि त्यानें येशू ख्रीस्ताच्या प्रे
स्थळाचा बंदोबस्त करावा ह्मणून विनंती केली.
सुभेदार त्यांस बोलला, तुह्मास पाहरा आहे, जा, आ
आपल्या समजुतीप्रमाणें बंदोबस्त करा. मग त्यानी
धोंडा प्रेतस्थळावर ठेविला होता त्यावर शिक्का छापि
आणि पाहरा ठेवून प्रेतस्थळाचा बंदोबस्त केला.

मग तिसऱ्या दिवसीं प्रथम उजेड होऊं लागल्य
मोठा भूमिकंप झाला, आणि देवाचा दूत प्रेतस्थळ
वळ उतरून त्यानें दारावरचा धोंडा लोटला. त्
दिसणें विजेसारिखें होतें, आणि त्याच्या भयाक
पाहरेकरी कांपले आणि मेल्यासारिखे झाले. त्या वे
कोणी शिष्य व दुसरीं मनुष्यें प्रेतस्थळाजवळ गेलीं अ
दूतानें त्यांस सांगितलें कीं, येशू ख्रीस्त एथें नाहीं,

ने सांगितलें तसें तो उठला आहे. मग कांहीं शोध रून ते निश्चयें समजले कीं तो जिवंत झाला खरें, मग तस्थळाजवळ ज्या सर्व गोष्टी झाल्या त्या त्यानी लोकांस ांगितल्या.

येशू ख्रीस्त जिवंत झाल्यावर त्याने आपल्या शिष्यां- वळ वेळोवेळ प्रगट होऊन त्यांस देवाच्या गोष्टी फार ांगितल्या; एका दिवसीं पांचशें मनुष्यानी त्याला पा- लें. मग चाळीस दिवस गेल्यावर आपल्या शिष्यांस मा करून त्याने त्यांस सांगितलें कीं, आकाशामध्यें आणि वीवर सर्व अधिकार मला दिल्हा आहे, यास्तव तुह्मी ाऊन सर्व प्रजांस शिष्य करा, बापाच्या व पुत्राच्या व प- त्र आत्म्याच्या नावाने त्यांस बाप्तिस्मा देत जा, ज्या ज्या ा सर्व आज्ञा तुह्मास दिल्ह्या त्या पाळावयास शिकवीत , आणि जगाच्या शेवटपर्यंत मी नेहमी तुह्माबरोबर आहें; तु देवापासून सामर्थ्य पावाल तोंपर्यंत यरूशालेमांत राहा. णि या गोष्टी बोलून त्यांच्या देखतां तो आकाशांत गेला णि ढगाने त्याला त्यांच्या दृष्टींतून झांकून घेतलें. मग ष्य माघारें यरूशालेमांत गेले, आणि जें वचन त्यांस ल्हें त्याची वाट पाहत राहिले.

आणि दाहा दिवस गेल्यावर शिष्य व अणखी कोणी क्तिमान् माणसें एका घरामध्यें देवाची प्रार्थना कराव- स जमलीं असतां, मोठ्या वाहात्या वाऱ्यासारिखा आका- तून नाद अकस्मात् झाला, आणि जेथें ते बसले होते सर्व घर त्याने भरलें. तेव्हां पवित्र आत्म्याची प्रे- ा त्या मनुष्यांच्या मनांत आली आणि तिजकडून ते राळ्या निराळ्या देशांच्या भाषा बोलूं लागले व चम-

त्कार करूं लागले ; यानंतर प्रेषितानी इस्राएल लोकां
उपदेश करून सांगितलें कीं, येशू ख्रीस्त ज्याला तुह्मी व
धस्तंभावर मारिलें, तोच जगाचा तारणारा आहे. तुह्म
त्याला वधिलें खरें, परंतु तो जिवंत होऊन मेलेल्यांमधू
उठला व आकाशांत गेला. त्याविषयीं आह्मी साक्ष
आहों, त्याला वधण्याने तुमचें पाप मोठें आहे, परंतु ज
पश्चात्ताप करून त्याजवर तुह्मी विश्वास ठेवाल, तर तुमच्य
पापांची क्षमा तो करील.

ही गोष्ट ऐकून लोक आपल्या अपराधांविषयीं विचा
करूं लागले, आणि जो सर्व मनुष्यांचा तारणारा त्याल
अव्हेरण्यांत आपण बहुत पातकी झालों, असें समजू
त्यानी आपलें पाप देवाजवळ कबूल केलें, आणि ये
ख्रीस्तावर विश्वास ठेवून प्रेषितांच्या हातून बाप्तिस्मा घे
तला. असें एका दिवसांत तीन हजार माणसें ख्रीस्त
च्या धर्मांत आलीं.

यानंतर थोडक्या दिवसानी पेत्रस व योहान्न दोन प्रे
षित देवळाजवळ प्रार्थना करावयास चढतांना, एका प
गळ्या माणसाने त्यांपासीं भीक मागितली. मग पेत्र
बोलला, रुपें व सोनें मजपासीं नाहीं, परंतु जें मजव
आहे तें मी तुला देतों, येशू ख्रीस्ताच्या नावाने तूं उ
आणि चाल. तेव्हां तो माणूस उठून बरा झाला, आणि
देवाची स्तुति करीत प्रेषितांसहित देवळांत गेला. अ
चमत्कार पाहून बहुत समुदाय मिळाले, मग त्या समुद
यांस पेत्रसाने उपदेश केला आणि समात झाल्यावर
मारें पांच हजार माणसें आपलीं पापें पदरीं घेऊन आणि
येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवून त्यानी बाप्तिस्मा घेतला.

पाहून अधिकारी प्रेषितांच्या पाठीस लागले आणि त्यांस मना करीत बोलले कीं, ही गोष्ट तुह्मी लोकांस सांगूं नका. तेव्हां प्रेषितानी उत्तर दिल्हें कीं, आह्मास देवाची आज्ञा अवश्य मानावी लागती. मग अधिकाऱ्यानी प्रेषितांतील एकाला जिवें मारिलें व दुसऱ्यांस फटके मारून त्यांचे हाल फार केले. तथापि ते येशू ख्रीस्ताची गोष्ट सांगत गेले, आणि बहुत लोक त्यांच्या मंडळींत मिळाले. मग जसी येशू ख्रीस्ताने त्यांस आज्ञा केली, तसें प्रेषित निराळ्या निराळ्या देशांत जाऊन सुवर्त्तमान सांगूं लागले. अगोदर बहुत यहूदी लोक निराळ्या निराळ्या देशांत जाऊन वस्ती करीत होते, प्रेषितानी प्रथम त्यांची भेट करून त्यांस सुवर्त्तमान सांगितलें. प्रेषितांच्या हातून असे घडलेले चमत्कार पाहून बहुत लोकानी त्यांचा उपदेश ऐकिल्यावर विश्वास धरिला आणि बाप्तिस्मा घेतला; अशा सर्व लोकांस ख्रिस्ती असें नाम झालें.

त्या वेळेस यहूदी लोकांशिवाय सर्व अन्य लोक मूर्त्तिपूजक होते, आणि जेव्हां बहुत ठिकाणीं कित्येक माणसें आपल्या वाडवडिलांचा धर्म सोडून येशू ख्रीस्ताचा धर्म आचरूं लागले, तेव्हां पूर्वीं सांगितल्याप्रमाणें अधिकारी व दुसरे लोक त्या माणसांचे हाल करूं लागले. त्यानी कित्येकांस जिवें मारिलें, कित्येकांस फटके मारिले, कित्येकांचा माल जप्त घेतला, कित्येकांस आपल्या जातींतून बाहेर काढिलें, आणि कित्येकांस धमकावून दूर देशांत पळविलें. त्यानी अशा उपायांकडून ख्रिस्ती लोकांस फार दुःख दिल्हें. परंतु जरीं एवढें दुःख झालें, तरीं ख्रिस्ती लोक अधिक झाले आणि दोनशें वर्षांपर्यंत वाढत वाढत

गेले. त्या वेळेस रोमी बादशाह धर्माविषयीं विचार करून ख्रिस्ती धर्म खरा आहे असें मानूं लागला. मग त्या बादशाहानें आपल्या सर्व प्रजांस सूचना केली कीं, त्यांच्या धर्मामुळें ख्रिस्ती लोकांस कांहीं उपद्रव करूं नये, यानंतर ख्रिस्ती लोक स्वस्थ राहिले.

त्या प्रेषितानी लोकांस उपदेश करून असें सांगितलें कीं, सर्व मनुष्यें पाप करून देवापासून भ्रष्ट आहेत आणि आपला उत्पन्न व रक्षण व पोषण करणारा जो परमेश्वर याला सोडून स्वच्छंदानें चालतात. असी अवज्ञा करणारे पृथ्वीवरील सर्व लोक देवाच्यासमोर दोषी आहेत, ते नरकाच्या मार्गांत पडले आहेत, आणि या पापांमुळें ते सर्व निरूपयोगी व निरूपायी झाले. आपल्या उद्धारासाठीं त्यांच्या हातून कांहीं पुण्य होत नाहीं आणि आपल्या पापाचें कांहीं प्रायश्चित्त त्यांस करितां येत नाहीं. तेव्हां देवानें अवतार धरून लोकांमध्यें वस्ती केली, त्या अवताराला येशू ख्रीस्त असें नाम दिल्हें आहे आणि आपण देवाचा अवतार व सर्व मनुष्यांस तारावयास समर्थ आहे असें लोकांस कळवायासाठीं त्यानें बहुत चमत्कारिक कामें केलीं. त्यानें शब्देंकरूनच आंधळ्यांस दृष्टि दिल्ही, पांगळ्यांस चालविलें व बहिऱ्यांस ऐकविलें व रोग्यांस निरोगी केलें. तो पायानी समुद्रावर चालला, त्यानें वारा आणि वादळ बंद केलें, एका समयीं त्यानें पांच भाकऱ्यानी पांच हजार माणसें तृप्त केलीं, आणि कित्येक जे मेले त्यांस जिवंत केलें. सर्व आयुष्यांत पवित्र राहिल्यावर शेवटीं त्यानें लोकांच्या पापांसाठीं प्रायश्चित्त करण्याकरितां दुष्ट माणसांच्या स्वाधीन होऊन दुःख भोगून आपला प्राण दिल्हा

यांच्या हातून मरण पावल्यावर त्याचें शरीर तीन दिवस पर्यंत कबरेंत राहिलें; मग तो जिवंत होऊन उठला व आकाशलोकांत गेला. तो सर्व सृष्टीवर अधिकार करितो, सगळ्या लोकांचें तारण करावयास तो शक्तिमान आहे, आणि त्यानें तारणाचा उपाय ह्मणजे सुवर्त्तमान, अवघ्या लोकांस सांगावयास आह्मास पाठविलें आहे. जो कोणी आपलें सर्व पाप कबूल करून येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवील व त्याच्या आज्ञेंत राहील तो तारण पावेल; जो विश्वास धरणार नाहीं तो आपल्या पापाचा योग्य दंड सोसील.

आणि प्रेषितानी उपदेश करितांना अणखी सांगितलें कीं, जो कोणी या तारणाऱ्यावर विश्वास ठेवितो त्याला तारणारा प्रिय होतो आणि त्याला पाप आवडत नाहीं, तो येशू ख्रीस्तासारिखा पवित्र होण्यास प्रयत्न करितो, आणि त्याच्या सर्व आज्ञा पाळितो. त्याच्या आज्ञा मानणें त्याला कठीण वाटत नाहीं, त्या सर्व पवित्र पूर्ण यथार्थ चांगल्या व सुखदायक अशा वाटतात. ह्या आज्ञा या प्रकारच्या आहेत, ह्मणजे ज्यानें आकाश व पृथ्वी उत्पन्न केली, असा जो परमेश्वर त्याजवर तुह्मी संपूर्ण मनानें प्रीति करा, त्याचें भजन आणि केवळ त्याचीच सेवा करा, मूर्तींच्या पायां पडूं नका, त्यांचें भजन करूं नका, त्यांस नमस्कार करूं नका, जें कांहीं उत्पन्न आहे त्याची पूजा किंवा भजन करूं नका, कारण कीं भगवान् जो तो आत्मा आहे, त्यासारिखा कांहीं नाहीं, त्याचें भजन मनानें व सत्यतेनें केलें पाहिजे, भगवानासमोर मूर्त्ति अमंगळ पदार्थ आहे आणि तो मूर्त्तिपूजेस कंटाळतो.

अणखी प्रेषितानी उपदेश करून सांगितलें कीं परमे-

श्वराचें नाम व्यर्थ घेऊं नको, आपल्या आईबापांची मर्यादा कर, मनुष्यांचा जीव घेऊं नको, व्यभिचार किंवा कांहीं मळीण काम करूं नको, चोरी करूं नको; लबाडी बोलूं नको, आणि खोटी साक्ष देऊं नको, दुसऱ्याचें जें कांहीं त्याजवर लोभ ठेवूं नको. आणि दुसऱ्याचें कांहीं वाईट करूं नको, अपकारांकरितां अपकार करूं नको, परंतु आपल्या वैऱ्याची क्षमा करून त्यांचें वरें कर, या जगांतील द्रव्यावर लोभ ठेवूं नको परंतु आकाशांतील सुखावर मन ठेव, दरिद्र्यांस धर्म कर, नागव्यांस नेसीव भुकेल्यांस खावयाला दे, तान्हेल्यांस प्यायाला दे, रोगी व बंदिवान् यांचा समाचार घे, आणि देवासारिखा पवित्र हो. आणि हीं सर्व कामें केल्यावर तूं जाण कीं आपण निरूपयोगी चाकर आहे, जितकें करावयास योग्य तितकेंच केलें, अधिक नाहीं.

यहूदी लोकानी येशू ख्रीस्ताला अव्हेरिलें आणि त्याच्या अधिकाऱ्यानी त्याला धरून जिवें मारिलें, हें त्यांचें मोठें पाप होतें, आणि या पापामुळें देवाचा राग त्या लोकांवर फार झाला. येशू ख्रीस्ताच्या येण्यापूर्वी सुमारें दीड हजार वर्षें मोश्याने यहूदी लोकांस सांगितलें कीं, तुह्मामध्यें तारणारा जन्मेल आणि त्याचें जो ऐकणार नाहीं त्याचा नाश होईल. यहूदी लोकानी त्यास अव्हेरिलें, या पापामुळें त्यांवर केवढी शिक्षा येणार हें येशू ख्रीस्ताने समजून आपल्या शिष्यांस सूचना केली, ह्मणून ते पळून नाश पावले नाहींत. येशू ख्रीस्त आकाशांत गेल्यावर सुमारें चाळीस वर्षांनी रोमी बादशाहाने यहूदी लोकांसीं लढाई करावयास मोठी फौज पाठविली, आणि

जेव्हां बहुत लोक वल्हांडण नामें एक मोठा सण माना-वयास यरूशालेमामध्यें मिळाले होते, तेव्हां फौजेने पोंहचून नगरास वेढा घातला. असें आपल्या राजधानीमध्यें एवढे लोक बंद केले असतां त्यांस कांहीं खावयाला मिळत नव्हतें आणि बहुत उपासाने मेले; कांहीं वेळानंतर सर्दाराने लढाई करून नगर आपल्या हातीं घेतलें आणि सर्व शहर आणि देऊळ यांचा नाश केला. उपास व लढाई यांकडून सुमारें अकरा लाख मनुष्यें मरण पावलीं, आणि जीं राहिलीं त्यांतील कित्येकांस सर्दाराने जुलूम करून आपल्या देशांत नेलें, व कित्येकांस गुलामपणामध्यें विकलें, आणि कित्येक भयाने निरनिराळ्या मुलखांमध्यें पळाले.

यानंतर यहूदी लोकांस कांहीं अधिकार राहिला नाहीं, आणि आजपर्यंत कांहीं अधिकार त्यांस मिळाला नाहीं. या लोकांतील कित्येक वेळोवेळीं ख्रिस्तीधर्मांत आले आहेत, परंतु निरनिराळ्या देशांत राहून बहुतकरून ते आपल्या वाडवडिलांच्या रीतीप्रमाणें चालतात. या लोकांतील कोणी मुंबईंत व या मुलखांतील बहुत दुसऱ्या ठिकाणीं राहतात, त्यांस इस्राएल व इब्री व यहूदी लोक असीं नामें दिल्हीं आहेत. येशू ख्रीस्ताच्या येण्यापूर्वीं जें शास्त्र त्यांच्या वाडवडिलांस दिल्हें होतें, तें शास्त्र मात्र ते मानितात, आणि तारणाऱ्याविषयीं ते कल्पितात कीं अझून तो आला नाहीं परंतु येईल, आणि मोठा राजा होऊन आमचे सर्व लोक एकवट करून फार वैभवाने त्यांवर अधिकार करील. असें समजून इस्राएल लोक शास्त्राचा अर्थ चुकतात, कां कीं तारणाऱ्याविषयीं ज्या सर्व भविष्य गोष्टी शास्त्रांत लिहून ठेविल्या आहेत त्या गोष्टी येशू ख्री-

स्ताचा जन्म व मरण व पुन्हा उठणें, यांमध्यें पूर्ण झाल्या, अणखी भविष्य गोष्टींमध्यें सांगितलें आहे कीं, इस्राएल लोकांचा अधिकार गेल्या अगोदर तारणारा येईल; तसा येशू ख्रीस्त आला, आणि यरूशालेमाचा नाश झाल्यापासून त्या लोकांस कांहीं अधिकार राहिला नाहीं. परंतु इस्राएल लोक सर्वदां अविश्वासी राहणार नाहींत, भविष्य गोष्ट असी आहे कीं, ज्याला त्यांच्या वाडवडिलानी मारिलें ह्मणजे येशू ख्रीस्त, त्याजवर सर्व इस्राएल लोक विश्वास ठेवितील आणि येणेंकरून देवाची कृपा फिरून त्यांस प्राप्त होईल.

प्रेषितांचा उपदेश ऐकून बहुत मनुष्यें ख्रिस्ती धर्मांत आलीं, हें मागें सांगितलें होतें. प्रेषितांच्या मरणानंतर तो धर्म वाढत गेला आणि कांहीं वर्षांनी बहुत मुलखांमध्यें पसरला. हें पाहून तो धर्म नाहींसा करण्याकरितां मूर्त्तिपूजक इत्यादिक फार प्रयत्न करूं लागले. रोमी बादशाहाने आपल्या सुभेदार अमलदार इत्यादिकांस आज्ञा केली कीं, ख्रिस्तीधर्म कोणाला सांगूं देऊं नका, आणि त्याप्रमाणें कोणाला चालूं देऊं नका, त्या धर्मांत जे आलेले आहेत त्यानी तो सोडावा आणि आपल्या वाडवडिलांचा धर्म फिरून आचरावा, आणि जर कोणी न ऐकतील तर त्यांचे हाल करा. या नियमावरून ख्रिस्ती लोकांचे हाल फार झाले, त्यांतील कित्येक ठार मारिले गेले, कित्येक गुलामपणामध्यें विकत दिल्हे गेले, आणि कित्येकांचीं शेतें माल इत्यादिक जप्त घेतले गेले. अशा बळात्काराकडून ख्रिस्तीलोकांस बहुत दुःख झालें, परंतु तो धर्म देवाने लाविला आणि त्यानेच चालविला, ह्मणून तो बहुत वाढत गेला. हें पाहून बादशाहाने ख्रीस्ताच्या मरणानंतर सु-

मारें तीनशें वर्षांनी नियम केला कीं, धर्मामुळें ख्रिस्तीलोकांचे हाल कोणी करूं नये. यानंतर थोड्या वर्षांनी बादशाहानें आपण बाप्तिस्मा घेतला, नंतर ख्रिस्ती लोकांचा बंदोबस्त झाला. इतक्यांत ख्रिस्ती धर्म विलायतांतील मुलखांमध्यें पसरला आणि अन्य धर्म फारकरून नाहींसे झाले. आशीखंडाच्या पश्चिमेंतील मुलूख, ह्मणजे आरबस्थान, इरान, इत्यादिकांत तो धर्म वाढला. भरतखंडांतहि कोणी उपदेशकानी येऊन खीस्ताची गोष्ट सांगितली, आणि तेव्हांपासून कित्येक ठिकाणीं तो धर्म चालत आला आहे; कालीकोटाच्या पलिकडे ह्मणजे मलबारी मुलखांत हजारोंहजार काळे ख्रिस्तीलोक राहतात.

बादशाहाची राजधानी रोमी नामें यामध्यें जो उपाध्या होता, तो दुसऱ्या उपाध्यांपेक्षां आपणास कांहीं मोठा मानूं लागला, आणि कांहीं वर्षांनंतर सर्वांनी त्याला थोर मानावें असा नियम बादशाहानें केला. त्या उपाध्याला पापा असें नाम झालें, आणि नंतर त्याच्या ठिकाणीं जे आले त्यानी अभिमान धरून निराळ्या निराळ्या उपायानी आपली शक्ति व पदवी वाढविली, आणि सर्व पश्चिमेकडील ख्रिस्ती लोकांवर ते अधिकार करूं लागले. पुढें तो पापा अधिक उन्मत्त होऊन देवाचें भजन करण्याच्या जशा रीति शास्त्रामध्यें सांगितल्या नाहींत तशा रीति लोकानी मानाव्या ह्मणून त्यानें त्यांस आज्ञा केली. त्या रीति शास्त्रामध्यें सांगितल्या नाहींत, हें लोकांस न समजावें ह्मणून त्यानें दुसरा नेम केला कीं उपाध्यांशिवाय कोणी शास्त्र वाचूं नये आणि आपल्याजवळ ठेवूं नये. त्या वेळेपासून ख्रिस्तीधर्म फार बिघडला गेला; आणि लोक अज्ञानी

होऊन येशू ख्रीस्त व त्याचे शिष्य व कोणी साधु यांची मूर्त्ति स्थापून त्यांची पूजा करूं लागले. यानंतर ही चाल त्या मुलखांत फार चालली, आणि कांहीं साकार भक्ति करूं नका, असी आज्ञा देवाने केली आहे हें लोकांस समजत नव्हतें. आणि ज्या रीति पापा याने नेमल्या त्यांशिवाय जर कोणी उपदेशकाने कांहीं रीति लोकांस शिकविल्या असतां, किंवा उपाध्यांशिवाय जर कोणी माणूस शास्त्रांतील शोध करूं लागला, तर पापा याने अमलदाराच्या योगाने त्यांस शिक्षा लाविली. याप्रमाणें पापाने बहुत वर्षें ख्रिस्तीलोकांवर अधिकार केला. मग सुमारें तीनशें वर्षांमागें विलायतेच्या पलिकडील देशांत कोणी मोठे उपदेशक, जसी शास्त्रामध्यें सांगितली, तसी देवाचें भजन करण्याची रीत लोकांस शिकवूं लागले, आणि सर्व लोकानी शास्त्र वाचून समजावें, असें ते त्यांस सांगूं लागले. तेव्हां पापाने त्या उपदेशकांस आज्ञा केली कीं, असें सांगूं नका, परंतु त्यानी ऐकिलें नाहीं. मग त्यांचा व पापाचा वादविवाद झाला. शेवटीं पापाचा अधिकार व रीति त्या उपदेशकानी टाकिल्या, आणि केवळ शास्त्राप्रमाणें आह्मी चालूं, असा निश्चय करून त्यानी आपलें मत प्रगट केलें. तेव्हां थोड्या वर्षानी त्या उपदेशकांच्या योगाने बहुतकरून त्या मुलखांतील लोकानी तसेंच केलें ज्या लोकानी पापा याचा अधिकार व त्याच्या सर्व रीति सोडिल्या, त्यांस प्रोतेस्तांत्स असें नाम झालें, आणि जे लोक पापा याचा अधिकार व रीति मानितात, त्यांस पापिस्त असें ह्मटलें आहे; त्या पापिस्तांमध्यें पोर्टुगाली किंवा फिरंगी लोक मानिले आहेत.

येशू ख्रीस्ताच्या मरणानंतर सुमारें साहाशें वर्षें आ-
र्बस्थानांतलें एक गांव मक्का नांवें त्यांत महंमद नामें एक
माणूस जन्मला होता. त्याच्या बाळपणांत त्याचीं आईबापें
मेलीं, यानंतर तो आजाच्या घरीं राहिला. थोड्या व-
र्षांनी त्याचा आजाहि मेला, मग त्याच्या काकाने त्याला
घेतलें व त्याला शिकविलें. महंमद कामाविषयीं हुशार
झाल्यावर एका द्रव्यवान् विधवेचा कारभारी झाला आणि
कांहीं वेळ गेल्यावर तिजसीं लग्न करून त्याने बहुत द्रव्य
मेळविलें. त्या वेळेस आरबीलोक बहुधा मूर्त्तिपूजक
होते, सुमारें चाळीस वर्षांचा झाल्यावर कांहीं नवा धर्म
थापावा असा बेत महंमदाने केला. मग त्याने जें शास्त्र
वाने पूर्वीं इस्राएल लोकांस दिल्हें, व ख्रीस्ताच्या शि-
यांनी जें लिहिलें होतें, त्यांतल्या कांहीं गोष्टी काढिल्या,
ाणि त्या कांहीं प्रकारें निराळ्या करून व आपण कांहीं
व्या कल्पित गोष्टी योजून त्यांसीं संबंध करून अशा यु-
ीनें एक नवें शास्त्र त्याने काढिलें. मग तो लोकांस
ांगूं लागला कीं, परमेश्वराच्या दूताच्या योगाने या गोष्टी
ा लिहिल्या, आणि या गोष्टी लोकांस कळवाव्या असी
ाज्ञा देवापासून मला झाली आहे. आणि या गोष्टी
्या आहेत याच्या प्रमाणासाठीं त्याने कांहीं साक्षात्कार
ाखवावे, किंवा चमत्कार करावे, असें महंमदाजवळून लोक
ागूं लागले, परंतु असें कांहीं प्रमाण त्याने कधीं केलें नाहीं.
जेव्हां महंमद आपलीं मतें लोकांस सांगूं लागला, तेव्हां
ाम त्यानी त्याची निंदा केली, आणि जेव्हां तो सांगत
ला, तेव्हां त्याला मारण्याचा मनसोबा त्यानी केला. हें
ाजून महंमद मदेना नामें गांवास पळाला; इतक्यांत

त्याच्या मनांत त्याचे चाकर व कोणी दुसरे संबंधी लोक आले होते. मदैनामध्यें कांहीं वेळ राहिल्यावर महंमद फौज मिळवून बळात्कार करून आपल्या मतांत लोकांस आणूं लागला, आणि त्या वेळेपासून त्याचा धर्म वाढत गेला. त्या धर्मांत जीं सर्व माणसें आलीं, त्यांस मुसलमान असें नाम झालें; मदैनास पळाल्यानंतर सुमारें चार वर्षांनी महंमद मेला, त्याचें पळणें मुसलमान लोक हिजैरा असें ह्मणतात; हाच त्यांचा शक आहे, आणि त्यापासून ते वर्षें मोजतात.

आपल्या मतांत लोकानी यावें, जसे उपाय महंमदानें केले त्याच्यामागें जे आले तसे त्यानी केले, अशा युक्तीनें कांहीं वर्षांनी आर्बस्थान व जवळील मुलूख यांमध्यें बहुत करून महंमदाचें मत चाललें. सुमारें आठशें वर्षांमागें मुसलमान लोक हिंदुस्थानांत आले आणि लढाई करून कांहीं मुलूख घेतले, दिल्ली त्यांची राजधानी झाली. यानंतर त्यांचा अधिकार फार वाढला; आणि त्यानी आपल्या धर्मांत जबरदस्ती करून ठिकाणोठिकाणीं हिंदुलोकांला आणिलें. सांप्रत मुसलमानांचा अधिकार कांहीं कमी झाला आहे, आणि त्याचें मत कोठें तरीं वाढत आहे याचें प्रमाण नाहीं.

सगळ्या पृथ्वीच्या लोकांस शिष्य करा, असी आज्ञा येशू ख्रीस्ताने केली, आणि सुमारें शंभर वर्षांपर्यंत ख्रिस्ती मत फार वाढलें. मग ख्रिस्ती लोक देवाची रीति बिघडून अज्ञानी झाले आणि त्याच्या आज्ञा ते विसरले नंतर पापाचा अधिकार व रीति यांपासून जे मोकळे झाले ते शास्त्र वाचून ती आज्ञा समजून ख्रिस्ती मत अन्य लो

कांस कळविण्याची चिंता धरूं लागले, आणि ज्या लोकांस ख्रिस्ती धर्म अझून कळत नव्हता, त्यांस तो सांगावयास बहुत उपदेशक गेले. सांप्रत बहुतकरून सर्व मुलखांत कोणी ख्रिस्ती उपदेशक आहेत; ते लोकांस उपदेश करितात आणि ख्रिस्ती शास्त्र त्या मुलखांतील भाषणांत उतरून व छापवून लोकांस देतात. तसेंच धर्माविषयींचीं लाहान पुस्तकें छापवून सर्वांस वांटितात, आणि सर्वांनी शास्त्र इत्यादिक समजावें ह्मणून ठिकाणोठिकाणीं साळा घालून लोकांस वाचावयास शिकवितात. या भरतखंडांत असे उपदेशक बहुत आले आहेत, आणि कित्येक ठिकाणीं ख्रिस्ती धर्मांत फार लोक येत आहेत. मद्रास, तिनाविली, त्रावनकोर, तांजोर, व रामेश्वराजवळील कांहीं प्रांतांमध्यें बहुत लोक ख्रिस्ती धर्मांत आले आहेत. तेथें कांहीं वर्षांमागें तीनशें वीस गांवचे लोक आपल्या वाडवडिलांचा धर्म व रीति सोडून ख्रिस्ती मतांत आले, आणि नेहमी कोणी कोणी विचार करून तसेंच करीत आहेत. सांप्रत वर्त्तमान आहे कीं तसेंच बंगाल देशांत लोक असें करीत आहेत; आणि तेथें कित्येक ठिकाणीं मूर्त्तिपूजा अगदी नाहींसी झाली आहे.

शास्त्रांत अशा भविष्य गोष्टी सांगितल्या आहेत कीं, ख्रिस्ती धर्म सगळ्या जगामध्यें चालेल आणि मूर्त्तिपूजा व सर्व अन्य धर्म नाहींसे होतील. या भविष्य गोष्टी पूर्ण होतील असा सर्व ख्रिस्ती लोकांचा विश्वास आहे. परमेश्वर जो सर्व सृष्टीचा उत्पन्न करणारा व रक्षण करणारा त्याचें भजन मात्र प्रथम सर्वांनी केलें होतें, मूर्त्तिपूजा व निराळ्या निराळ्या प्रकारचे अन्य धर्म उत्पन्न झाले. हीं

सर्व लबाड मतें सोडून अवघ्या पृथ्वींतील लोक खऱ्या देवा-
कडे फिरतील, आणि त्याची सुभक्ति करितील. तेव्हां
सर्व मनुष्यें एकमेकांसीं प्रीतीनें वर्त्ततील, आणि कांहीं
लढाया किंवा बळात्कार कोणत्याहि ठिकाणीं होणार ना-
हींत. सारे लोक असे बहुत वेळ राहिल्यावर येशू ख्रीस्त
जो आतां आकाशलोकांत प्रत्यक्ष आहे, तो जगामध्यें मो-
ठ्या वैभवानें येईल, आणि जगाच्या प्रारंभापासून त्या दिव-
सापर्यंत जेवढीं माणसें पृथ्वीवर मेलीं त्यांस तो जिवंत करील
मग जे सजीव झाले आणि जे त्या समयीं पृथ्वीवरील रा-
हत असतील त्या सर्वांस येशू ख्रीस्त आपल्यासमोर बोला-
वून त्यांच्या सर्व आयुष्यांतील कामांचा हिशोब घेईल
मग तारणाचा उपाय, ह्मणजे पापांचा पश्चात्ताप करणें
येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवणें, व देवाच्या सुभक्तीस लागणें
असें ज्यानी केलें, त्यांस तो एकीकडे ठेवील ; आणि ज्यानी
असें केलें नाहीं त्यांस तो सांगेल, अहो शापग्रस्त, मजपा-
सून दूर नरकांत निरंतर दुःख सोसावयास जा. मग जे
देवाचे सुभक्त, त्यांस घेऊन आकाशलोकांत तो जाईल आ-
णि ते त्याच्याबरोबर राहत सर्वकाळ कल्याण पावतील.

आतां असा निश्चय समजा कीं, येशू ख्रीस्ताशिवाय
दुसरा तारणारा कोणी नाहीं ; जीं सर्व माणसें आपलें
पाप सोडून येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवून त्याच्या रीतीप्र-
माणें चालतात, तीं देवाची कृपा पावतील. परंतु त्याला
जे अव्हेरितात, ते कोणत्याहि दुसऱ्या उपायानी तारण
पावणार नाहींत, असें देवानें खचीत सांगितलें आहे. मर-
णानंतर दुसरा जन्म होईल असें कल्पूं नका, या आयु-
ष्यांत तारणाचा उपाय जो घेतो तो मेल्यावर आकाश

लोकांत जाऊन तेथें सर्वकाळ राहील, आणि असा उपाय जो घेत नाहीं, तो मेल्यावर नरकांत जाऊन तेथें सर्वकाळ राहील, कां कीं अनेक जन्म कोणाला कधींहि होत नाहींत.

प्रत्येक माणसाच्या परीक्षेसाठीं हें आयुष्य देवाने नेमलेलें आहे; आणि जोंपर्यंत आपलें आयुष्य चालत आहे तोंपर्यंत आपलें सार्थक शोधा, कांहीं उशीर करूं नये. पावसाळ्यामध्यें जर कोणीएक माणूस आळसाने आपलें शेत पेरीत नाहीं, तर त्याच्यासाठीं पाऊस खोळंबणार नाहीं, आणि माघारें येणार नाहीं; तसें या आयुष्यांत जो पाप सोडून देवाची कृपा पावत नाहीं, त्याला कांहीं उपाय राहत नाहीं, त्याच्यासाठीं मरण उशीर करणार नाहीं आणि मेल्यावर आकाशलोकासाठीं सिद्ध होण्याचा मुहूर्त मिळणार नाहीं. उद्यांचा दिवस कसा उगवेल हें तुह्माला ठाऊक नाहीं ह्मणून उद्यांचा विश्वास धरूं नये, सांप्रत पापाचा दंड चुकावयाचा आणि आकाशलोकाचें सुख मिळावयाचा उपाय आहे. तो उपाय मागें सांगितला आहे; येशू ख्रीस्त जो जगाचा तारणारा त्याने मनुष्यांच्या तारणासाठीं प्रायश्चित्त केलें, येणेंकरून सुखाचा मार्ग तुह्मापुढें उघडला आहे. तुह्मी आपल्या पापाचें दुःख नरकामध्यें न सोसावें ह्मणून त्याने आपल्या आंगीं तुमच्या पापासाठीं दुःखें सोसलीं. एवढी दया व प्रीति त्याने जर तुह्मावर केली तर त्याजवर प्रीति करावी व विश्वास ठेवावा हें फार योग्य आहे. मनुष्यांवर एवढे उपकार केल्यावर तो सर्वांस ह्मणतो कीं, अहो सर्व पृथ्वीचे लोकांहो, तुह्मी मजकडे पाहा, आणि तारले जा, जो कोणी मजकडे येतो त्याला मी दूर करणार नाहीं, ज्याची इच्छा असेल त्याने मजकडे येऊन ता-

रण घ्यावें. अहो जे तुह्मी पापाच्या ओझ्याने भारवलेले व लादलेले आहां ते तुह्मी मजकडे या आणि मी तुह्मास विसांवा देईन, ज्याला ऐकावयाचे कान आहेत तो ऐको. अहो वाचणारे आणि ऐकणारे, आपल्या अंतःकरणांत आपल्या पापांचा संताप उत्पन्न होईपर्यंत, आपल्या पापाचें चिंतन अहोरात्र करा, आणि तुमच्या मनांत येशू ख्रीस्तावरील प्रीति होईपर्यंत, त्याच्या प्रीतीचें ध्यान करा. आपणाला तारणारा पाहिजे आणि येशू ख्रीस्ताशिवाय कोणी तारणारा नाहीं, असें खचीत समजून त्याच्या नावाने परमेश्वराला शरण जा, आणि आपलें पाप कबूल करून आपलें अंतःकरण पवित्र करण्याकरितां त्याजपासीं पवित्र आत्म्याची प्रेरणा मागत जा. देवाचा एक मोठा भक्त जो दावीद त्याची प्रार्थना असी होती कीं, हे परमेश्वरा, तूं मजमध्यें निर्मळ अंतःकरण उत्पन्न कर, आणि मजमध्यें यथायोग्य आत्मा निर्माण कर. याप्रमाणें तुह्मी फार आग्रह करून देवापासीं विनंती करीत जा.

## देवाची प्रार्थना.

हे दयाळू परमेश्वरा, तूं सर्व सृष्टीचा उत्पन्न करणारा आहेस, त्वां मला जन्मास घातलें आणि पहिल्यापासून तूं माझें पोषण व संरक्षण केलें. हे दयाळू देवा, तूं माझा धनी आहेस आणि तुझे उपकार मजवर फार झाले, ह्मणून म्या संपूर्ण मनाने तुजवर प्रीति करावी व तुझ्या सर्व आज्ञा मानाव्या, हें योग्य आहे. परंतु हे कृपाळू बापा, मी तुला विसरलों व तुझ्या आज्ञा मोडल्या. असें तुझ्यासमोर मी पापी व निरुपायी झालों, ह्मणून काय करूं? माझ्या ह

3477-41
lot 26

ून कांहीं पुण्य होत नाहीं व कांहीं प्रायश्चित्त होत नाहीं.
ं कृपाळू भगवान्, मजवर दया कर, आणि येशू ख्रीस्त
याने पापी लोकांवर प्रीति करून अवतार घेतला आणि
ांच्या पापांसाठीं प्रायश्चित्त केलें, त्याच्या नावाने मी तुझा
ाश्रय करितों. मी आपलीं पापें कबूल करितों, माझ्या
ापांची क्षमा कर. मी अज्ञानी आहें, मला ज्ञान दे. मी
ाप करून नरकाच्या मार्गांत पडलों आहें. तुझा मार्ग
ला समजेव आणि त्यामध्यें चालण्याची बुद्धि व शक्ति
जवर दया करून दे. पुढें मी तुझें भय धरावें आणि
जवर प्रीति करून तुझ्या आज्ञांप्रमाणें चालावें ह्मणून
ला बुद्धि दे. आतांपासून मी आपल्या तारणाविषयीं
ोग्य काळजी धरावी आणि जसा त्वां उपाय कळविला
सा जोंपर्यंत मी या आयुष्यांत असेन तोंपर्यंत करीत जा-
ा आणि मेल्यावर सर्वकाळ कल्याण आकाशलोकांत पा-
वें; ही माझी प्रार्थना मी येशू ख्रीस्ताच्या नावाने व त्या-
या पुण्यामुळें तुझ्यापासीं करितों; आमेन.

समाप्त.

मुंबईमध्यें आमेरिकान् मिशन् छापखान्यांत छापिलें,
ख्रिस्ती शक १८४५.

THE LIBRARY OF CONGRESS

NOV 77
NOV
BOUND BY
HNM

LIBRARY OF CONGRESS
0 039 326 398 2